दै. गोदातीर दि. 10-10-24

# अवैध वाळू चोरी करणाऱ्या टिप्पर चालक व मालकावर गुन्हा दाखल; दोन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड–** पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशावरून जिल्ह्यात अवैध धंद्यावर प्रतिबंध करण्यासाठी प्रयत्न होत असतांना काही महाभाग वेगवेगळ्या शक्कल वापरत अवैध वाळू वाहतूक करत आहेत. अशाच एका वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले. यावेळी चालक आणि मालक यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून टिप्परसह दोन लाख पाच हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत नऊ ऑक्टोबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मिलिंद सोनकांबळे यांचे पथक गस्त घालत होते. मामा चौक, जुना कौठा परिसरात वाळू वाहतूक करणारा एक टिप्पर समोर येताना त्यांना दिसला. या वाहनास थांबवून चालकास ताब्यात घेतले. विनापरवाना बेकायदेशीररित्या शासनाचा महसूल चुकवून टिप्परमध्ये एक ब्रास ५ हजार रुपये किमतीची वाळू वाहतूक करताना आढळून आला. पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे यांच्या फिर्यादीवरून टिप्पर मालक अशोक प्रकाश माने (वय ४२, रा. नरोबा मंदिराजवळ जुना कौठा नांदेड) आणि टिप्पर चालक शेख इरफान शेख जिलानी (वय ३५, रा. वाजेगाव, नांदेड) या दोघांविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.